सोबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे "दिनांक १ जानेवारी, २०१८ ते दि.१५ जानेवारी, २०१८ या कालावधीत, "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत" या विषयाचे शासन पत्र क्रमांक संकीर्ण १११९/प्र.क्र.१७१/१६)/समन्वय, दिनांक २२.१२.२०१७ ची प्रत सहपत्रांसह सोबत जोडत आहे.

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१७/शा३०८१
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 9/1/2018

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.

अस्था ३
3/1/18

( सुचित्रा रणदिवे )
सहाय्यक संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१८/ 56
दिनांक 05 JAN 2018

प्रति,
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

यांना कळविण्यात येते की, मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मभापं-२०१७/प्र.क्र.१०९/भाषा-२, दि.२३.११.२०१७ च्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे दिनांक १ जानेवारी, २०१८ ते दिनांक १५ जानेवारी, २०१८ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत:- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

आवक क्र. ३०८९
२८/१२/१७

## महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण -१११९ /(प्र.क्र.१७१/१६) /समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :- २२ डिसेंबर, २०१६.

प्रति,

विभागातील सह सचिव ( विद्यापीठ शिक्षण ) उप सचिव (महाविद्यालयीन शिक्षण/ तंत्र शिक्षण. /कला / ग्रंथालये) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

संचालक (~~उच्च शिक्षण~~ / तंत्र शिक्षण / ~~कला~~ / ~~ग्रंथालय) महाराष्ट्र~~ राज्य.

पत्र प्राप्त झाले

विषय :- दिनांक १ जानेवारी, २०१८ ते दि.१५ जानेवारी, २०१८ या कालावधीत, " मराठी भाषा संवर्धन पंधरवडा " साजरा करणेबाबत.

संदर्भ :- १) मराठी भाषा विभागाचे परिपत्रक क्रमांक.मभापं-२०१५/प्र.क्र.७०/ भाषा-२, दि.२२.७.२०१५.
२) मराठी भाषा विभागाचे परिपत्रक क्रमांक.मभापं-२०१७/प्र.क्र..१०९/ भाषा-२, दि.२३.११.२०१७.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन परिपत्रक कृपया पहावे.

२. मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर दि.१ जानेवारी ते दि.१५ जानेवारी, हा कालावधी प्रतिवर्षी " मराठी भाषा संवर्धन पंधरवडा " म्हणून साजरा करण्याचा निर्णय मराठी भाषा विभागाच्या दि.२२.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये यामध्ये दि.१ जानेवारी, २०१८ ते दि.१५ जानेवारी, २०१८ या कालावधीत, मराठी भाषा विभागाचे संदर्भाधिन क्र.२ च्या शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करुन " मराठी भाषा संवर्धन पंधरवडा " साजरा करण्याबाबत कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

( रा.वि.जाधव )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मा.अपर मुख्य सचिव ( उच्च व तंत्र शिक्षण विभाग), यांचे स्वीय सहायक.

२८/१२/१७

दिनांक १ जानेवारी ते दिनांक १५ जानेवारी, २०१८ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : मभापं-२०१७/प्र.क्र.१०९/भाषा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २३-११-२०१७

वाचा:- मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक-मभापं-२०१५/प्र.क्र.७०/भाषा-२, दिनांक २२ जुलै, २०१५.

: शासन परिपत्रक :

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी प्रतिवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचा निर्णय संदर्भाधीन दिनांक २२ जुलै,२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये / महामंडळे, राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये / मंडळे / सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था / विद्यापीठे / महाविद्यालये इत्यादी सर्व संस्थांना दिनांक १ जानेवारी, २०१८ ते १५ जानेवारी, २०१८ या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्याबाबत पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) राज्यामध्ये मराठी भाषेचा राजभाषा म्हणून सार्वत्रिक वापर करण्याच्या दृष्टीने सदर पंधरवड्यात सर्व संस्था / कार्यालये यांनी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करावे. यामध्ये सर्व मंत्रालयीन विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालये/ महामंडळे / स्थानिक संस्था, राज्यातील केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये / महामंडळे / उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका यांनी सक्रीय सहभाग घ्यावा.

२) सर्व मंत्रालयीन विभागांनी आपले कार्यालय व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांना **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** साजरा करण्याबाबत सविस्तर आदेश द्यावेत.

३) सर्व शाळा व महाविद्यालये यांनी त्यांच्या स्तरावर सदर पंधरवड्यात भाषा संवर्धनाकरिता विविध परिसंवाद / व्याख्याने / स्पर्धा / कार्यशाळा / शिबिर यांचे औचित्यपूर्ण आयोजन करावे.

४) मराठी वाचन संस्कृती वाढावी यादृष्टीने संबंधित तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन तसेच ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, काव्य वाचन इत्यादीचे आयोजन करावे.

५) शाळा/महाविद्यालये यांनी आपल्या विद्यार्थ्यांसहित पुस्तकाचे गांव भिलार येथील प्रकल्पास भेट द्यावी.

६) राज्यातील अमराठी भाषिकांना मराठी भाषेचा सुलभ पध्दतीने परिचय करुन देण्याच्या दृष्टीने कार्यशाळा / स्पर्धा इत्यादीचे आयोजन करावे.

७) त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारितील सर्व कार्यालये / मंडळे / सार्वजनिक उपक्रम यांनी मराठीचा वापर करणे अनिवार्य आहे. तरी याबाबतची जागरुकता निर्माण करण्याकरिता सदर कार्यालयांनी या पंधरवड्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करावे.

८) सर्व खाजगी बँका / व्यापारी बँका यांनी आपापल्या कार्यालयांतर्गत मराठी भाषेसंबंधी वैविध्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करावे.

९) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी आपल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून याबाबतचे संदेश प्रसारित करावेत.

या कार्यक्रमासाठी येणारा खर्च संबंधित विभागांनी / कार्यालयांनी चालू वित्तीय वर्षात कार्यालयीन खर्चासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागवावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७११२२१६५७१४३५३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajashri Uday Bapat

Digitally signed by Rajashri Uday Bapat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Marathi Language Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0abe21e41785319194707f89dc0e9ab5156282f4a89952d9774a26fade711538, cn=Rajashri Uday Bapat
Date: 2017.11.24 17:59:56 +05'30'

(राजश्री बापट)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४) मा.मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
५) विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ, मुंबई (पत्राने).
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य (पत्राने).
७) सर्व विभागीय आयुक्त.
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
१०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
११) शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक / प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१२) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,

१३) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई (पत्राने),

१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),

१५) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानसभा, विधानभवन, मुंबई.

१७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,

१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),

१९) महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,

२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

२२) भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई,

२३) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,

२४) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,

२५) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,

२६) सर्व विभागीय सहायक भाषा संचालक, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नवी मुंबई,

२७) सर्व केंद्रीय कार्यालयांची मुख्यालये / बँका व सार्वजनिक उपक्रम यांची मुख्यालये (स्वतंत्र पत्राद्वारे)

२८) सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना सविस्तर सूचना द्याव्यात.

२९) निवड नस्ती (भाषा-२).